**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**
पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
पत्ता – १२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार–४२५४१२
कार्यालय संपर्क कमांक – ☎ (०२५६४) २३०००९
इमेल आयडी – ✉dyspacbnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

ला.प्र.वि.कार्यालय,नंदुरबार
दिनांक २९/१२/२०२२.

## :–प्रेस नोट :–

आलोसे श्री. दिनेश शामराव रणदिवे वय–४२,व्यवसाय नोकरी – गोडाऊन किपर (वर्ग ३) तहसिल कार्यालय नंदुरबार मुळ रा. अजंग ता.जि.धुळे हल्ली मुक्काम प्लाट नं ११–ब शरद घरकुल, दुधाळे शिवार ता.जि.नंदुरबार **यांनी ३५,०००/–रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २९,०००/– रुपये लाचेची मागणी केली बाबत...**

| | |
|---|---|
| घटक | नंदुरबार |
| गुन्हा नोंद कमांक | कार्यवाही सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ , ७ (अ) प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आलोसे श्री. दिनेश शामराव रणदिवे वय–४४,व्यवसाय नोकरी – गोडाऊन किपर (वर्ग ३) तहसिल कार्यालय नंदुरबार मुळ रा. अजंग ता.जि.धुळे हल्ली मुक्काम प्लाट नं ११ब शरद घरकुल, दुधाळे शिवार ता.जि.नंदुरबार |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३५,०००/– रुपये (३५ हजार रुपये) |
| तडजोडीअंती मागणी केलेली लाचेची रक्कम | २९,०००/– रुपये (एकोणतीस हजार रुपये) |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे अनरद ता. शहादा येथे संत मिराबाई महीला बचत गट या नावाने रेशन दुकान चालवित आहेत. दिनांक २१/१२/२०२२ रोजी रेशन दुकानाची पाहणी करण्यासाठी डी.एस.ओ./जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे सोबत आलोसे श्री. दिनेश शामराव रणदिवे (गोडाऊन किपर) हे गेले होते. तक्रारदार यांच्या रेशन दुकानाची पाहणी करीत असतांना संबंधीत आलोसे यांनी तक्रारदार यांना सांगीतले की, रेशन दुकानाच्या बाहेर बोर्ड लावलेला नाही, रेकॉर्ड व्यवस्थित ठेवलेले नाही, तुमची धान्य वितरण करण्याची पध्दत बरोबर नाही, रेशन दुकानातील धान्य व्यवस्थित ठेवलेले नाही. असे सांगुन तक्रारदार यांच्या कडुन आलोसे श्री. दिनेश शामराव रणदिवे (गोडाऊन किपर) यांनी पैश्यांच्या स्वरुपात लाचेची मागणी केली. याचवेळी आलोसे श्री. दिनेश शामराव रणदिवे (गोडाऊन किपर) यांनी तक्रारदार यांना सांगीतले की, 'काय आहे ते साहेबांचे करुन टाका. माझे ५,०००/– रुपये व साहेबांचे ३०,०००/– रुपये असे एकुण ३५,०००/– रुपये लागतील.<br>त्यानंतर याबाबत तक्रारदार यांनी दिनांक २२/१२/२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात समक्ष येवुन तक्रार दिली असता पंच साक्षीदारांसमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान आलोसे श्री. दिनेश शामराव रणदिवे (गोडाऊन किपर) यांनी प्रथमतः तक्रारदार यांचेकडुन साहेबांचे ३०,०००/– रु. व स्वत:साठी ५,०००/– रु. अशी एकुण ३५,०००/– रु. लाचेच्या रकमेची मागणी केली. यानंतर तडजोडीअंती साहेबांच्या नावाने २५,०००/– रु. व स्वत: साठी ४,०००/– रु. अशी एकुण २९,०००/– रु. लाचेची मागणी केली म्हणुन गुन्हा.<br>आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| **कामगिरी पथक** | सदर कामगिरी पोलीस उपअधीक्षक श्री.राकेश आनंदराव चौधरी, पोलीस निरीक्षक श्री. समाधान महादु वाघ, पोलीस निरीक्षक श्रीमती. माधवी एस.वाघ, पोहवा/विलास पाटील, पोहवा/विजय ठाकरे, पोना/अमोल मराठे, पोना/देवराम गावीत, मपोना/ज्योती पाटील, पोना/नावाडेकर, पोना/मनोज अहिरे,चापोना/जितेंद्र महाले अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार पथकाने केली आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई–मेल : dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/अॅप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १०६४
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४– २३०००९,२३१००९

( राकेश आ.चौधरी )
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नंदुरबार

Scanned with CamScanner